MHWS100000692022

| | | | |
|---|---|---|---|
| दाखल तारीख | ०६ | ०१ | २०२२ |
| नोंदणी तारीख | ०६ | ०१ | २०२२ |
| निकाल तारीख | २५ | ०३ | २०२६ |
| कालावधी | ०४ वर्षे | ०२ महिना | १९ दिवस |

## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालय, मालेगांव.

(शेख मोहम्मद वसीम अक्रम, पिठासीन अधिकारी)

**नियमित फौजदारी खटला क्र. १२/२०२२** **नि.क्र. ४०**

**महाराष्ट्र शासनतर्फे,**
प्रभारी अधिकारी,
जऊळका पोलीस स्टेशन,
ता. मालेगांव, जि. वाशिम. **सरकार**

**विरुद्ध**

१. **बबन दाजीबा गुडदे**
वयः ५८ वर्षे, व्यवसायः शेती,

२. **प्रविण बबन गुडदे**
वयः ३४ वर्षे, व्यवसायः शिक्षण,

३. **राजकुमार बबन गुडदे**
वयः ३१ वर्षे, व्यवसायः शिक्षण,
सर्व रा. पिंपळा, ता. मालेगांव, जि. वाशिम. **आरोपी**

**भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दंडणीय अपराध**

---

अभियोगपक्षातर्फे विद्वान विधिज्ञ – सौ.एम.एस.सुपारे
आरोपींतर्फे विद्वान विधिज्ञ – श्री.बी.एस.साठे

---

| | |
|---|---|
| अपराध घडल्याचा दिनांक (Date of offence) | १४/०५/२०२१ |
| प्रथम खबरी अहवालाचा दिनांक (Date of FIR) | १४/०५/२०२१ |

| | |
|---|---|
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक (Date of Chargesheet) | ०६/०१/२०२२ |
| दोषारोप/प्रतिकथन नोंदविल्याचा दिनांक<br>(Date of framing of Charge/Particular) | २९/११/२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक<br>(Date of commencement of Evidence) | ११/०३/२०२६ |
| न्यायनिर्णय राखून ठेवल्याचा दिनांक<br>(Date on which Judgment is reserved) | युक्तीवाद ऐकल्यानंतर तात्काळ न्यायनिर्णय देण्यात आला. |
| न्यायनिर्णय दिल्याचा दिनांक (Date of the Judgment) | २५/०३/२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक (Date of sentencing Order, if any) | – |

| अ.क्र. (Rank of the accused) | आरोपीचे नाव (Name of accused) | अटक केल्याचा दिनांक (Date of arrest) | जमानतीवर सोडल्याचा दिनांक (Date of release on bail) | कलम (Offence charged with) | मुक्तता अथवा शिक्षा (Whether acquitted or convicted) | शिक्षा (Sentenced imposed) | न्यायाधीन बंदी असल्याची तारीख कलम ४२८ प्रमाणे |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बबन दाजीबा गुडदे | अटक नाही. | २२/१०/ २०२४ | भा.दं.वि. कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ | निर्दोष | – | – |
| २ | प्रविण बबन गुडदे | | | | निर्दोष | – | – |
| ३ | राजकुमार बबन गुडदे | | | | निर्दोष | – | – |

## **न्यायनिर्णय**

(दिनांक २५/०३/२०२६ रोजी पारित )

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ नुसार शिक्षा पात्र गुन्ह्याकरिता अभियोगपक्षातर्फे दाखल करण्यात आला आहे.

२. अभियोगपक्षाचे संक्षिप्त कथन असे आहे की, कथित घटना दिनांक १५/०५/२०२१ रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास मौजा पिंपळा, ता. मालेगांव, जि. वाशिम येथे घडली होती. कथित घटनेच्यावेळेस सर्व आरोपींनी एकमेकांसोबत संगनमत करुन समान उद्देश ठेवुन चंदु जाधव

याच्या शेतातील आंबा उतरवुन चंदु जाधव याला दिल्याच्या कारणावरुन फिर्यादीसोबत वाद घातला होता. कथीत घटनेच्यावेळेस आरोपी क्र.२ प्रविण याने पाईपने व आरोपी क्र.३ राजकुमार याने काठीने फिर्यादीच्या डोक्यावर मारहाण केली होती. त्यानंतर फिर्यादीने सदरील घटनेबाबत पोलीस स्टेशन, जऊळका येथे आरोपींविरुद्ध फिर्याद दाखल केली होती. फिर्यादीने कथित घटनेच्या दिलेल्या फिर्यादवरुन ठाणे अंमलदार यांनी गुन्हा क्र.१४३/२०२१ नोंदविला.

३. तपासी अंमलदाराने तपासाच्या दरम्यान साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा व दोन जप्ती पंचनामे तयार केले तसेच तपासाअंती आरोपींविरुध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

४. माझ्या पुर्व पिठासीन अधिकारी यांनी आरोपींविरुध्द नि.क्र.०९ प्रमाणे भारतीय दंड विधान कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ अन्वये दोषारोप ठेवला. आरोपींनी गुन्हा कबूल नसल्याचे कथन करुन खटला चालविण्याची विनंती केली. आरोपींचा बचाव पूर्णतः नकाराचा आहे. आरोपींविरुध्द सबळ पुरावा आढळून न आल्याने आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ३१३ अन्वये बयान नोंदविण्यात आले नाही.

५. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता सौ.एम.एस.सुपारे आणि आरोपींतर्फे विधिज्ञ श्री.बी.एस.साठे यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. प्रकरणात दाखल कागदोपत्री पुरावा यांचा विचार करता माझ्यासमक्ष खालील मुद्दे प्रकरणाच्या निर्णयासाठी विचारार्थ आहेत. सदर मुद्यावर कारणमीमांसेसह माझे निष्कर्ष खालीलप्रमाणे नोंदवित आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे सिद्ध केले काय की, दिनांक १५/०५/२०२१ रोजी सकाळी ७.३० वाजताच्या सुमारास मौजा पिंपळा, ता. मालेगांव, जि. वाशिम येथे सर्व आरोपींनी एकमेकांसोबत संगनमत करुन समान उद्देश ठेवुन चंदु जाधव याच्या शेतातील आंबा उतरवुन चंदु जाधव याला दिल्याच्या कारणावरुन फिर्यादीसोबत वाद घातला होता काय ? तसेच आरोपी क्र.२ प्रविण याने पाईपने व आरोपी क्र.३ राजकुमार याने काठीने फिर्यादीच्या डोक्यावर मारहाण केली होती काय ? | नकारार्थी. |
| २. | आदेश काय ? | आरोपींची सुटका. |

## कारणमिमांसा

### मुद्दे क्र.१ व २ करिता

६. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एकूण २ साक्षीदार तपासले आहेत. साक्षीदार क्र.१ फिर्यादी लक्ष्मण विश्वनाथ झाटे व साक्षीदार क्र.२ महादेव विश्वनाथ झाटे यांची साक्ष अनुक्रमे नि.क्र.३१ व ३४ वर नोंदविण्यात आलेली आहे.

७. साक्षीदार क्र.१ फिर्यादी लक्ष्मण झाटे याने त्याच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, तो आरोपींना ओळखतो कारण आरोपी त्याच्या गावातील रहिवाशी आहेत. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, कथित घटना कधी घडली होती, कुठे घडली होती आणि काय घडली होती याबाबत त्याला काहीही माहित नाही. फिर्यादीने पुढे असे कथन केले आहे की, त्याने रागाच्या भरात आरोपींविरुद्ध फिर्याद दिली होती. फिर्यादीने जबानी रिपोर्ट नि.क्र.३२ आणि छापील प्रथम खबरी अहवाल नि.क्र.३३ यांच्यावरील अंगठे मान्य केले; परंतु त्यातील मजकूर माहीत नसल्याचे कथन केले. फिर्यादीने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना फिर्यादीची उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली, परंतु फिर्यादीला उलटतपासात विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची फिर्यादीने नकारार्थी उत्तरे दिली. फिर्यादीने उलटतपासात त्याच्या जबानी रिपोर्टमधील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी का नमूद केला याचे कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले. फिर्यादीचा उलटतपास आरोपींच्या विधिज्ञांनी नाकारला. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, फिर्यादीने अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. फिर्यादीच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे सुद्धा निदर्शनास येते की, फिर्यादीने त्याच्या पुराव्यात आरोपींविरुद्ध काहीही कथन केलेले नाही. सबब, सदरील कारणास्तव फिर्यादीची साक्ष ग्राह्य धरता येत नाही.

८. साक्षीदार क्र.२ महादेव झाटे याने त्याच्या सरतपासणीत असे कथन केले आहे की, तो आरोपींना ओळखतो कारण आरोपी त्याच्या गावातील रहिवाशी आहेत. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, फिर्यादी त्याचा भाऊ आहे. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, कथित घटना कधी घडली होती, कुठे घडली होती आणि काय घडली होती याबाबत त्याला काहीही माहित नाही. सदर साक्षीदाराने पुढे असे कथन केले आहे की, पोलिसांनी त्याचे बयान नोंदविले नव्हते. सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास सहकार्य केले नाही म्हणून सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांना सदर साक्षीदाराची उलटतपासणी घेण्याची परवानगी देण्यात आली, परंतु सदर साक्षीदाराने उलटतपासात विचारण्यात आलेल्या सर्व सूचक प्रश्नांची नकारार्थी उत्तरे दिली. सदर साक्षीदाराने उलटतपासात

त्याच्या बयानातील अधोरेखांकित भाग अ पोलिसांनी का नमूद केला याचे कारण सांगू शकत नसल्याचे कथन केले. सदर साक्षीदाराचा उलटतपास आरोपींच्या विधिज्ञांनी नाकारला. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, सदर साक्षीदाराने अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. सदर साक्षीदाराच्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे सुद्धा निदर्शनास येते की, सदर साक्षीदाराने त्याच्या पुराव्यात आरोपींविरुद्ध काहीही कथन केलेले नाही. सबब, सदरील कारणास्तव सदर साक्षीदाराची साक्ष ग्राह्य धरता येत नाही.

९. अभिलेखाची पडताळणी केली असता असे सुध्दा निदर्शनास येते की, फिर्यादी आणि सर्व आरोपी यांची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झालेली आहे, त्याप्रमाणे त्यांनी अभिलेखावर आपसी तडजोडनामा नि.क्रं.३० दाखल केलेले आहे.

१०. आरोपींच्या विधीज्ञांनी घटनास्थळ पंचनामा, दोन जप्ती पंचनामे व फिर्यादी साक्षीदार क्र. १ लक्ष्मण विश्वनाथ झाटे याचे वैद्यकिय प्रमाणपत्र मान्य केले असल्यामुळे त्यांना अनुक्रमे नि.क्र.३५ ते ३८ देण्यात आलेले आहे.

११. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी साक्षीदार क्र.१ फिर्यादी लक्ष्मण झाटे याची साक्ष महत्वाची होती; परंतु फिर्यादीने अभियोगपक्षाला कोणत्याही प्रकारे सहकार्य केले नाही. साक्षीदार क्र.२ महादेव झाटे यानेसुध्दा अभियोगपक्षास कोणत्याही प्रकारे सहकार्य केलेले नाही. घटनास्थळ पंचनामा व दोन जप्ती पंचनामे यांना अनुक्रमे नि.क्र.३५ ते ३७ देण्यात आले तरी घटनास्थळ व दोन जप्ती पंचनाम्यातील मजकुर सिध्द झालेला नाही, तसेच कथित घटनास्थळ व कथीत जप्ती सिध्द झालेली नाही. जबानी रिपोर्ट नि.क्र.३२, छापील प्रथम खबरी अहवाल नि.क्र.३३, घटनास्थळ पंचनामा नि.क्र.३५, दोन जप्ती पंचनामे नि.क्र.३६ व ३७ व फिर्यादी साक्षीदार क्र. १ लक्ष्मण विश्वनाथ झाटे याचे वैद्यकिय प्रमाणपत्र नि.क्र.३८ यांना निशाणी क्रमांक देण्यात आले असले तरी आरोपींनी गुन्हा केला याबाबत इतर कोणताही कागदोपत्री किंवा तोंडी पुरावा अभिलेखावर आलेला नाही. अभियोगपक्षाने सादर केलेला पुरावा आरोपींविरुध्द कोणताही गुन्हा सिध्द करण्यास पात्र नाही, त्यामुळे सर्व आरोपी सुटण्यास पात्र आहेत. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला एक लोखंडी पाईप व एक वेळुची काठी मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावेत. वरील सर्व विवेचनावरुन मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे व मुद्दा क्र.२ करिता खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ ते ३ यांची फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८ (१) अन्वये भारतीय दंड विधान, १८६० च्या कलम ३२४ व ५०४ सह कलम ३४ नुसार शिक्षा पात्र असलेल्या गुन्ह्याच्या आरोपातून सुटका करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र.१ ते ३ यांचे वैयक्तीक व जमानत पत्र रद्द करण्यात येते.

३. फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७(अ) च्या तरतुदीच्या पुर्ततेसाठी आरोपी क्र.१ ते ३ यांनी प्रत्येकी १५,०००/– रू.चा वैयक्तीक जातमुचलका व तेवढ्याच रकमेचा जामीन मुचलका द्यावा.

४. सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला एक लोखंडी पाईप व एक वेळुची काठी मूल्यहीन असल्यामुळे अपील कालावधी संपल्यानंतर नियमाप्रमाणे नष्ट करण्यात यावेत.

[न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.]

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.03.25 17:58:21 +0530

दिनांकः २५/०३/२०२६.

मोहम्मद वसीम अक्रम
पि. मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.१), मालेगांव.

# सूची–I

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

### अ. अभियोगपक्षाचे साक्षीदारः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| अ.सा.क्र.१–नि.क्र.३१ | लक्ष्मण विश्वनाथ झाटे | फिर्यादी |
| अ.सा.क्र.२–नि.क्र.३४ | महादेव विश्वनाथ झाटे | साक्षीदार |

### ब. आरोपीचे साक्षीदार, असल्यासः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

### क. न्यायालयीन साक्षीदार, असल्यासः–

| अ.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरूप |
|---|---|---|
| – | – | – |

## अभियोगपक्ष/आरोपी/न्यायालयीन निशाणी क्रमांकांची यादी

### अ. अभियोगपक्षः–

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १ | ३२ | जबानी रिपोर्ट |
| २ | ३३ | छापील प्रथम खबरी अहवाल |
| ३ | ३५ | घटनास्थळ पंचनामा |
| ४ | ३६ व ३७ | दोन जप्ती पंचनामे |
| ५ | ३८ | फिर्यादी साक्षीदार क्र.१ लक्ष्मण विश्वनाथ झाटे याचे वैद्यकिय प्रमाणपत्र |

**ब. आरोपीः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**क. न्यायालयः–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

**ड. मुद्देमालः–**

| अ.क्र. | वस्तू/आर्टीकल क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| – | – | – |

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by MOHMAD WASIM AKRAM MOHMAD JALAL SHEAIKH
Date: 2026.03.25 17:58:27 +0530

दिनांकः २५/०३/२०२६.

मोहम्मद वसीम अक्रम
पि. मोहम्मद जलाल शेख
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(कोर्ट क्र.१), मालेगांव.

## CERTIFICATE

**I affirm that the contents of this P.D.F file Judgment/Order are same word to word, as per the original Judgment/Order.**

| | |
|---|---|
| Name of Stenographer | C. R. Lande (Grade III ) |
| Name of Court | **Shri. M. W. A. M. J. Sheaikh,**<br>C.J.J.D. & J.M.F.C., (Court No.1), Malegaon, Distt. Washim. |
| Date of Dictation | 25/03/2026 |
| Judgment/Order signed by the PO on | 25/03/2026 |
| Judgment /Order uploaded on | 25/03/2026 |